MAHARASHTRA TIMES 6 JAN 1991

घरकर आणि बाहर

अंबरीश मिश्र

देव-गाणी

नव्या वर्षाची सुरुवात तुकोबांच्या आणि ज्ञानियाच्या, एकनाथ-महाराजांच्या आणि कबीराच्या स्मरणाने व्हावी, याहून दुसरा आनंद तो काय ? एक जानेवारीला राष्ट्रीय संगीत नृत्य नाट्य केंद्राचं टाटा सभागृह तुडुंब भरलेलं ! शाल, स्वेटर, पांघरुणात लपेटलेले रसिक 'देव गाणी' ऐकायला वारकऱ्याच्या भक्तीभावनेने आले होते.

कार्यक्रम उत्तम रंगला, पु. लं. आणि अशोक रानडे कर्णधार असल्यावर मग काय विचारता ! सगळं खटॅखॅट. एकदम सुनियोजित. रानड्यांनी केलेलं निरूपण तर निव्वळ अप्रतिम. रानडे हा माणूस तसा अवलिया फकीरच. त्यात विषयही त्यांच्या खास मर्जीतला. रानड्यांनी कुठून कुठून माहिती संकलित, एकत्रित केली, तोड नाही त्याला.

अन् तरीही 'देव-गाणी' ऐकताना काही गोष्टी खटकल्या. त्यांचा उल्लेख करावा, असे वाटतं. पहिली गोष्ट — अप्रचलित भजनं किंवा अभंग निवडावीत, हरकत नाही. पण मग एकदम अनवट, अवघड भजनं निवडण्याचा आग्रह कशाला ? एखाद-दुसरं भजन ओळखीचं, तोंडी बसलेलं आलं असतं, तर फारसं बिघडलं नसतं.

दुसरं, रंजना जोगळेकर, उत्तरा केळकर वगैरे स्त्री कलावंत फार वरच्या पट्टीत गात होते. एकूणच आपल्याकडे हे वरच्या पट्टीत गाऊन सुरांशी धिंगामस्ती करण्याचं ट्रेंड वाढत चाललंय. बैठकीतलं गाणं असेल, तर एकवेळ ठीक आहे. परंतु, भक्ती-रसात चिंब भिजलेली भजनं आळवताना वरचा हा सूर चांगलाच खटकतो.

शरद जांभेकर, केदार गोडसे छान गातात. वाद नाही. पण परवा त्यांनीही आपापली तयारी कशी गजबूत आहे, हे दाखविण्यातच वेळ वाया घालवला. सबंध कार्यक्रमात भक्तीभाव तसा अभावानेच जाणवला. हे असं का व्हावं ? फारच 'प्रोफेशनल पद्धतीने कार्यक्रमाचं संयोजन केल्यामुळे असेल का ? की सादरीकरणाला नको तितकं महत्त्व दिल्यामुळे ? पाच गवळणी ऐकताना सारखं जाणवत होतं, की निदान या गाण्याला तरी तालीम अधिक व्हायला हवी होती.

मध्यंतरानंतरचा तो लहान मुलांचा कापडी नाच कशाला घातला होता, नीटसं ध्यानात आलं नाही. तो नाच धड जमलाही नव्हता. पुन्हा, आधीच मंचावर कलावंतांची इतकी गर्दी झाली होती की त्या बापड्या मुलांना हातवारे करायला पुरेशी जागाच नव्हती.

शिवरामबुवा वरळीकर हे भजन-वारकरी संप्रदायातलं मोठं नाव. पण बुवा नीट खुलले नाहीत. 'वृद्धपणी तुम्ही सासुबाई....' हे त्यांचं भारूड असं रेंगाळतच, घरंगळतच गेलं. ''क्या गाऊँ, कौन सुननेवाला'' किंवा 'जग से हटकर...' या दोन अप्रचलित हिन्दी भजनांपेक्षा इतर कबीर-मीरची थोडीशी ओळखीची गाणी घेतली असती, तर अधिक बरं झालं असतं.

मारुतीबुवा बागडेंकडे उत्तम परफॉर्मिंग सेन्स आहे. आवाज तर सुरेल आहेच. परंतु, ते हल्ली 'फेस्टिवल ऑफ इंडिया' टाईप कार्यक्रम करतात की काय, अशी शंका येऊ लागलीये. गाण्यापेक्षा 'गिमिक्स' अधिक होऊ नयेत, हे कुणीतरी बुवांना सांगायला हवं.

महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा प्रभाव फार जबरदस्त. त्याचं उत्कट दर्शन 'देव-गाणी'मध्ये घडेल, असं वाटलं होतं. पण सगळं नको तितकं सुघड अन सुव्यवस्थित होतं. शेवटच्या पसायदानाने मात्र वारकरी संप्रदायाची आठवण तीव्रतेने झाली. धीरगंभीर, थोडसं उदास, वेगळ्याच वातावरणात घेऊन जाणारं ते पसायदान. काळजाला थेट भिडणारं, श्रुती सडोलीकरच्या रिवायतने तर भल्याभल्यांच्या (उदाहरणार्थ, उलट्या काळजाचे आमचे मित्रवर्य वृंदावन दंडवते) डोळ्यात पाणी आणलं.

'देव-गाणी'ने असं काही अधिक वेळा डोळ्यात पाणी आणलं असतं तर बरं झालं असतं.

न पटणारी समीक्षा

'बहर आणि बहार' या सदरातील 'देवगाणी' या कार्यक्रमाविषयीचे समीक्षण (म. टा. ६ जानेवारी) वाचले. या कार्यक्रमात भक्तिरस नव्हता, अशी टीका श्री. अंबरीश मिश्र यांनी केली आहे. परंतु त्यादिवशी देवगाणी ऐकण्यासाठी आलेले श्रोते ''वारकऱ्याच्या भक्तिभावनेने'' आलेले नव्हते. श्रोत्यांनी गर्दी केली होती, ती मुख्यतः पु. लं. च्या खुसखुशीत निवेदनाचा आनंद घेण्यासाठी व रानडे यांचे संशोधनात्मक विवेचन ऐकण्याकरिता; आणि अर्थात काही अप्रचलित भजनंही ऐकण्यासाठी.

रानडे यांनी एखाद्या भजनाची माहिती इसवीसनापासून तो ताल-मात्रापर्यंत एका ठराविक तयारीने दिल्यावर जांभेकरांना ते भजन गात असता कितीसा भक्तिभाव आणता येईल ? आधीचे निवेदन देशभक्तीने ओतप्रोत भरलेले असेल, तरच गायकाला ही गोष्ट शक्य होईल. 'देवगाणी' या कार्यक्रमाचे संयोजन फक्त भक्तिरस निर्माण करण्यासाठी नव्हते, त्याचा थाटच वेगळा होता. तो तसा असणार, अशीच लोकांची अपेक्षा दिसली.

मुलांचा कापडी नाच व्यावसायिक पातळीवरचा नव्हता, हे खरे. परंतु त्या नाचाने एक निर्मळ आनंद दिला. नाही तरी पु. लं. नी आपल्या वागण्या बोलण्याने या सुनियोजित, सुघड कार्यक्रमातला बोजड व्यावसायिकपणा काढून टाकलाच होता. **अरुणा राव**, मुंबई

पुलंनी सादर केलेली देवगाणी

महाराष्ट्र टाइम्स दि. ७.१.९१

अमरेंद्र नंदू घनेश्वर

राष्ट्रीय संगीत नाटक केंद्राने धर्म आणि संगीत या विषयावर एक महोत्सव नुकताच आयोजित केला होता. १ जानेवारीला 'देवगाणी' या कार्यक्रमाने या महोत्सवाची सांगता झाली. धर्म आणि संगीत यांच्यातलं नातं समजावून सांगणाऱ्या या कार्यक्रमाविषयी हा लेख.

'देवगाणी'मध्ये गाताना उत्तरा केळकर, सोबत श्रुती सडोलीकर

धर्म आणि संगीत यांचं फार जवळचं नातं आहे. हे नातं फक्त हिंदू धर्मापुरतं मर्यादित नाही. ख्रिश्चन चर्चने आपल्या धर्मात संगीताला विशेष महत्व दिलं आहे. शीख पंथाबद्दलही तेच म्हणता येईल. इस्लाम संगीताच्या विरोधात आहे, असा एक प्रबळ मतप्रवाह आहे. परंतु इस्लामपासूनच निघालेल्या सूफी पंथाने संगीताच्या माध्यमातून ईश्वराची आराधना केली.

राष्ट्रीय संगीत नाटक केंद्राने धर्म आणि संगीत या विषयावर एक महोत्सव नुकताच आयोजित केला होता. 'कालनिर्णय'ने या प्रकल्पात राष्ट्रीय संगीत नाटक केंद्राशी सहकार्य केलं होतं. धर्म आणि संगीत यांच्यातील संबंधांवर प्रकाश टाकणारी व्याख्यानं या निमित्ताने झाली. बंगालमधली बाऊल गीतं, राजस्थानातली सूफी गीतं, ओरिसातल्या अष्टपद्या, गुजरात-सौराष्ट्रातले ह्वेली संगीत, गोव्यातले ख्रिसमस कॅरॉल्स् असे संगीताचे विविध कार्यक्रम या ठिकाणी झाले. या महोत्सवाचा समारोप डॉ. अशोक रानडे आणि पु. ल. देशपांडे यांनी सादर केलेल्या 'देवगाणी' या कार्यक्रमाने झाला. या रंजक आणि उद्बोधक कार्यक्रमात अनेक कलाकार सहभागी झाले होते.

धर्म आणि संगीत यांच्यातलं नातं समजावून सांगताना पु. लं. नी गीतेतल्या 'मद्भक्ताः यत्र गायन्ति' या पंक्तीचा आधार घेतला. ''यावरून परमेश्वराचं गाणाऱ्या भक्तावर किती प्रेम आहे हे कळतं. तुकाराम महाराज म्हणत, 'मी गातो-नाचतो,' रामदास स्वामी म्हणत, 'धन्य ते गायनी कळा', कबीर, मीरा, तुलसी सर्व संत गाण्यातून आपल्या भावना व्यक्त करताना गाण्याचा सहारा घेत. विनोबा भावे एकदा म्हणाले की, भूदान यात्रेला अपेक्षित यश मिळालं नाही, कारण तिच्यासोबत टाळ-मृदंगाचा ध्वनी नव्हता.'' पु. लं. चं हे वाक्य दाद घेऊन गेलं.

डॉ. अशोक रानडे यांच्या चोख अभ्यासातून हा कार्यक्रम साकार झाला ही गोष्ट उघड आहे. पु. लं. चं उत्तेजन आणि त्यांच्या लोकप्रियतेबाबतही त्यांच्या यशात वाटा होता. रानडे यांच्या मते ज्या संगीताला आपल्याकडे शास्त्रीय संगीतकार लोकसंगीत किंवा भक्तिसंगीत म्हणून काहीसा खालच्या दर्जा देतात त्या भक्तिसंगीताचं किंवा लोकसंगीताचं प्रगत असं शास्त्र आहे. हे शास्त्र [illegible] आणि त्यातून [illegible] जन्माला आले याचा वेध रानडे यांनी घेतला. नुसता ग्रंथालयात बसून अभ्यास न करता प्रयोगसिद्ध करणेला आवश्यक असणाऱ्या प्रत्यक्ष प्रयोगाचं परिमाण (त्यांनी या कार्यक्रमातल्या गायक-गायिकांना प्रत्यक्ष तालीम देऊन) दिलं.

आपल्या विश्लेषक दृष्टीचा आणि बहुश्रुतेचा प्रत्यय त्यांनी निवेदनाद्वारे आणून दिला. सर्व तत्वज्ञान सांगून झाल्यावरही काही सांगण्याची आवश्यकता वाटली म्हणून 'गीत' निर्माण झाले. इथे तत्वज्ञ हा नुसता तत्वज्ञ न राहता वाग्गेयकार झाला. गीतांचे एकूण एकावन्न प्रकार लिहिलेले दिसतात. परंतु मौखिक परंपरेमुळे फक्त सतरा प्रकार प्रत्यक्षात होती लागतात. मराठी भाषेतलं पहिलं भक्तिगीत राजा सोमेश्वराच्या मानसोल्लासातलं आहे. ही गोष्ट १११० सालची. हे पद रंजना जोगळेकरांनी म्हटलं. ओवी म्हणजे सहजपणे गायलं जातं ते गीत. सैलपणा आणि सहजता ही ओवीची वैशिष्ट्यं. ''ओवीला ताल नसतो; पण लय असू शकते,'' असं रानडे यांनी सांगितलं. महानुभाव पंथी दामोदर पंडित यांनी रचलेली चौपदी केदार बोडस आणि शरद जांभेकर यांनी म्हटली. 'सारंग' रागाशी जवळीक दाखवणारी तिची सुरावट होती.

'भारूड' या प्रकारात लौकिक गोष्टींमधून तत्वज्ञान येतं. एकनाथांची भारूडं अशा प्रकारची आहेत. ''वृद्धपणी शांती धरा तुम्ही सासूबाई नरमगरम मागू नका अंती सुख नाही,'' असा उपदेश करणारं एक गमतीदार भारूड शिवरामबुवा वरदीकर आणि मंडळींनी सादर केलं.

'आरती' करणारी मनुष्य आत्मविश्वासाने गातो. ''हा प्रकार अत्यंत समाधानाचा आहे. कारण त्यात गायनाचा न. सा. वि. असतो'', असं रानडे म्हणतात. ''आपण गातो असं [illegible] वाटत असतं'', असं पु. ल. [illegible]

दुःखगीत श्रुती सडोलीकरांनी सादर केलं. 'विराणी' म्हणजे भक्त आणि भगवंत यांच्यातलं विरहगीत. उत्तरा केळकर यांनी अशीच एक विराणी पेश केली.

संतांनी अत्यंत खोलवर जाऊन रागांचा आणि तालांचा विचार केला होता. १६ व्या शतकातल्या दासोपंतांनी १६००हून अधिक पदं रचली आणि त्यात ७६ वेगवेगळे राग होते. तसंच चतरंग, त्रिवट, पाळणे इत्यादी प्रकार होते. रानडे यांनी हे सांगितल्यावर सभागृह विस्मयचकित झालं. प्रचलित नसणाऱ्या तालांमध्ये त्यांनी रचना इतक्या बेमालूम बांधल्या होत्या की ऐकणारा अचंबित व्हावा. याचा अर्थ या संत लोकांनी ताल आपल्या अंगी मुरवला होता.

या कार्यक्रमात सर्वाधिक गुण डॉ. अशोक रानडे यांनाच द्यावे लागतील. मारुतीराव बागडे, वरदीकरबुवा बिनधास्त तडफेने गायले. रंजना जोगळेकर, उत्तरा केळकर, केदार बोडस, शरद जांभेकर, श्रुती सडोलीकर वगैरे कलाकार मनापासून गायले. गायकांच्या उच्चारांकडे अधिक लक्ष पुरवणं आवश्यक आहे. एका गायिकेने टोपड्याचा उच्चार 'ठोपडे' असा केला. 'पांडुरंग कांती' ऐवजी 'पांडुरंग आजी' असं एका गाण्यात ऐकू येत होतं. पु. लं. चे ओढून-ताणून आणलेले विनोद आणि कोठ्या वगळता एकूण निवेदन रंजक होतं. भक्तिमार्गाच्या विकासाबरोबर अनेक गीतप्रकार कसे विकसित झाले हेच या कार्यक्रमाचं प्रमुख सूत्र.

MAHARASHTRA TIMES Date 14 OCT 1991

संत परंपरेचा मागोवा घेणारी मधुर 'देवगाणी'



१ जानेवारी, १९९१ रोजी एन. सी. पी. ए. मध्ये सर्वश्री पु. ल. देशपांडे व डॉ. अशोक रानडे ह्यांनी अथक परिश्रम घेऊन भक्तीगीतांचा कार्यक्रम सादर केला होता. त्याला रसिकांनी प्रचंड दाद दिली होती. त्याच कार्यक्रमाची ही ध्वनिफीत.

महाराष्ट्राला लाभलेल्या संतपरंपरेचा जाणीवपूर्वक अभ्यास करून त्यातील निवडक रचना डॉ. अशोक रानडे ह्यांनी स्वरबद्ध केल्या आहेत. शरद जांभेकर, श्रुती सडोलीकरसारखे शास्त्रीय संगीतातील मान्यवर, उत्तरा केळकर, रंजना जोगळेकरसारख्या सुगम संगीत सादर करणाऱ्या नामवंत गायिका तर मारुतीबुवा बागडे आणि शिवरामबुवा वरळीकरांसाख्या अस्सल भजनीबुवांनी ही देवगाणी सादर केली आहेत.

नऊ मात्रांच्या तालातील अनवट

ध्वनिफीत

चीजांबरोबर साधेसोपे सरळ भारुडही ह्या कॅसेटमध्ये आहे. त्याच बरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या पारंपारिक आरत्यांचाही समावेश या ध्वनिफितीत केलेला आहे.

ह्या देवगाण्यांच्या सुरवातीला डॉ. अशोक रानड्यांचे अभ्यासपूर्ण निवेदन आहे. भक्तीसंगीताच्या गोडव्याने व विश्लेषक प्रास्ताविकतेने समृद्ध असलेल्या या ध्वनिफितीत संत परंपरेचा मागोवा घेतलेला आहे. अभिरुचीसंपन्न रसिकांसाठी ही संग्राह्य ध्वनिफीत म्हणजे एक पर्वणीच आहे. 'कालनिर्णय'ने सादर केलेली ही 'देवगाणी' 'झपाटा'तर्फे वितरीत झाली आहेत.

दोन भागात असलेल्या या ध्वनिफितीतील रचना : झनकार, जेणे रसातळ उणू (रंजना जोगळेकर), पाडले म्हणती (उत्तरा केळकर), जैसे तरंग सागरा (शरद जांभेकर, केदार बोडस), गड्यानो राजा (मारुतीबुवा बागडे), पांडुरंग कांती (श्रुती सडोलीकर-काटकर), रमा रंग (रंजना जोगळेकर) सासुरवाशीण (शिवरामबुवा वरळीकर), आरती रचना (समूह गान) आम्ही कापडी (रंजना जोगळेकर), जगतसे हटकर (शरद जांभेकर), निधान निर्गुण (केदार बोडस), पडिले दूरदेशी (उत्तरा केळकर) रिवायत (श्रुती सडोलीकर-काटकर), पंढरीस जावे (शरद जांभेकर), गवळण (मंजुषा कुलकर्णी, स्मिता तानवडे), कमळाच्या स्कंधी (डॉ. अशोक रानडे), पसाबदान

26 April 1992

Lokprabha

कॅसेट वार्ता

■ माधव इमारते

मनाच्या देव्हाऱ्यात जपून ठेवावी अशी 'देवगाणी'

'कालनिर्णय' व 'झपाटा' प्रस्तुत 'देवगाणी' या शीर्षकाखाली दोन ध्वनिफितींचा अलबम् नुकताच निघाला आहे. डॉ. अशोक रानडे यांचे दर्जेदार संगीत, अभ्यासपूर्ण व माहितीपूर्ण निवेदनामुळे या दोन्ही ध्वनिफिती अतिशय श्रवणीय झाल्या आहेत.

धर्म आणि संगीत यांची अतुट सांगड ज्या देशामध्ये घडली त्या महाराष्ट्रातील धर्मसंगीताची ही ओळख आहे. या संगीताला ८०० वर्षांची परंपरा आहे. महाराष्ट्रात धर्मसंगीताचे जवळजवळ ५१ प्रकार आहेत. त्यापैकी १५, १६ संगीत प्रकार मांडायचा प्रयत्न प्रस्तुत कॅसेटमध्ये केला आहे. ओवी, अभंग, भारुड, गौळण, कापडी गीत, रिवायत, आरती, विराणी आदी प्रकारांचा यात समावेश आहे.

पखवाज वादनाने सुरुवात केल्यानंतर ११३१ मध्ये सोमेश्वर नावाच्या राजाने लिहिलेल्या 'मानसोउल्हास' यामधील 'जेणे रसातळ उणु' या मत्स्यावताराचे वर्णन असलेल्या (गायिका- रंजना जोगळेकर) गीताने पहिल्या ध्वनिफितीची सुरुवात होते. त्यानंतर महानुभाव वाङ्मयातील प्राचीन ओवी 'पाऊले म्हणती' (उत्तरा केळकर), शरद जांभेकर व केदार बोडस यांनी मिळून गायिलेला अभंग 'जैसे तरंग', 'गड्यांनो राजा कि हो झाला' हा मारुतीबुवा बागडे यांनी लयबद्ध कथनासहित गायिलेला अभंग हे एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला 'पांडुरंग कांती' (श्रृती सडोलीकर), 'रमारंग हृदय संग' (रंजना जोगळेकर) हे अतिशय सुंदर शब्दरचना असलेले गीत, शिवरामबुवा वरळीकर यांच्या खास मिश्किल शैलीतील

'वृद्धपणी शांतीधरा तुम्ही सासुबाई' हे एकनाथांचे भारुड व शेवटी महाराष्ट्रातील आरत्यांचे काही नमुने सादर केले आहेत.

दुसऱ्या ध्वनिफितीची सुरुवात 'कापडी' गीताने होते. त्यानंतर रामानंदी पंथाचे निपट निरंजन यांची 'जगतसे हटकर' ही रचना शरद जांभेकरांनी गायिली आहे. त्यानंतर अनुक्रमे दासोपंतांचे 'निधान निर्गुण' (केदार बोडस), 'पडिले दुरदेशी' (उत्तरा केळकर) व श्रृतीने भावपूर्ण आवाजात गायिलेली गरीब अब्दुल खाँ रचयित 'रंगीत पालना हौसेन केला' ही रिवायत, तर दुसऱ्या बाजूला 'पंढरीस जावे' (शरद जांभेकर) हा नामदेवाचा अभंग, मंजुषा कुळकर्णी व स्मिता तनावडे या दोन तरुण व नवोदित गायिकांनी म्हटलेली पाच रंगाची व पाच तालात असलेली गवळण, स्वतः अशोक रानडेंनी गायिलेली 'कमळाची स्कंधी' ही रचना व शेवटी पसायदान असे या दोन्ही ध्वनिफितींचे स्वरूप आहे.

महाराष्ट्रातील धर्मसंगीताच्या परंपरेचे एक मनोज्ञ दर्शन यात घडते. यातील अशोक रानडेंचे संगीत हे दर्जेदार आहेच, शिवाय त्यांच्या काव्य आणि संगीताचा खोल अभ्यासही दिसून येतो. काव्यातील आशय सुरावटी आणि लयीबरोबर समृद्ध होत जातो. प्रत्येक चालीत नेमकेपण आहे, शब्दांना जपलेले आहे. वाद्याची जोड पुरकच आहे. संगीत आणि गायनाला कुठेही अति होऊ दिलेले नाही. रागदारी संगीत व पारंपरिक संगीताचा एक सुरेख संगम यात दिसतो. वैविध्यपूर्ण तालांचा तसेच एकाच गाण्यात थोड्याफार फरकाने केलेल्या लयींचा वापर यात दिसतो. यातील प्रत्येक गाण्याबद्दल सांगणे शक्य नाही. तरी 'पांडुरंग कांती' ही चाल अप्रतिम झाली आहे. याला तोड नाही. 'रमारंग', 'जैसे तरंग', 'कमळाचे स्कंधी', 'पाऊले म्हणती' आदी चालीही सुंदरच आहेत. दुसरा महत्त्वाचा भाग रानडेंचे निवेदन स्पष्ट व स्वच्छ आवाजात, कुठेही मुद्याला न सोडता, माहितीपूर्ण निवेदन हे या ध्वनिफीत संचाचे दुसरे वैशिष्ट्य. 'ओवीचा अभंग कसा झाला', 'भारुड म्हणजे बहुरुढ', 'आरत्यांना केव्हा सुरुवात झाली', 'आरत्यांचे साचे किती आहेत', 'रिवायत म्हणजे काय' अशा अनेक प्रकारच्या माहितीने हे निवेदन भरलेले आहे.

यातील सर्वच गायक-गायिकांनी भरपूर मेहनत घेतल्याचे पदोपदी जाणवते. त्यामुळे कुठलेही गाणे रेंगाळले नाही, ढेपाळले नाही, बेसूर नाही. नेमस्तपणे म्हणजे आपण प्रिसाइजली म्हणतो तसे. त्यांना दाद द्यावी तेवढी थोडीच आहे. तरीपण मन हेलावते ते श्रृती सडोलीकरांच्या 'पांडुरंग कांती'ने व रिवायतच्या गायनाने. या दोन्ही कॅसेटस् ऐकल्यानंतर आपण काहीतरी चांगले ऐकल्याचे निश्चितच समाधान होते व सध्याच्या भक्तिसंगीताच्या नावाखाली निघत असलेल्या बाजारू कॅसेटची शिसारी येते. मराठी माणसांनी आपल्या मनाच्या देव्हाऱ्यात जपून ठेवावी अशी ही 'देवगाणी.'

हार्दिक
शुभेच्छा

व्ही.एन्.
चिपळूणकर

जर्दवाले
सातारा

प्रायोजक

आपल्या जीवनात
अर्थ-पुर्ण
संगीतमय
साथ

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

-आपुलकीनं वागणारी माणसं!

लोकरंगमंच

लोकरंगमंच, सातारा
प्रेक्षक परिवार योजना १९९२

दशक महोत्सव

शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी १९९२ रोजी
रात्री ९.३० वाजता
शाहू कला मंदीर, सातारा येथे
राष्ट्रीय संगीत-नाट्य केंद्र. एन.सी.पी.ए.
मुंबई निर्मित

देवगाणी

10 दशक महोत्सव

लोकरंगमंच

धर्म आणि संगीत यांचं फार जवळचं नातं!
हे नातं फक्त हिंदू धर्मा पूरतच मर्यादित नाही.
ख्रिश्चन चर्चने आपल्या धर्मात संगीताला विशेष
महत्व दिलेले आहे. शिख पंथा बाबत ही तेच म्हणता
येईल. इस्लाम संगीताच्या विरोधात आहे असा एक
प्रबळ मत प्रवाह आहे. परंतु इस्लाम मधुनच निघालेल्या
सुफी पंथाने संगीताच्या माध्यमातुन
ईश्वराची आराधना केली.
संतांनी खोलवर जावून रागांचा आणि तालांचा विचार
केला होता. सोळाव्या शतकातल्या दासोपंतानी सोळाशेहून
अधिक पदं रचली आणि त्यात शाहत्तर वेगवेगळे राग होते.
तसेच चतरंग, त्रिवट पाळणे इत्यादी प्रकार होते. प्रचलित
नसणाऱ्या तालामध्ये त्यांनी रचना इतक्या बेमालूम
बांधल्या होत्या की ऐकणारा अचंबित व्हावा. याचा अर्थ
या संतानी ताल आपल्या अंगी मुरवला होता.
सर्व तत्वज्ञान सांगून झाल्यावरही काही सांगण्याची
आवश्यकता वाटली म्हणून
"गीत" निर्माण झालं
इथे तत्वज्ञ हा नुसता तत्वज्ञ न राहता वाग्गेयकार
झाला गीतांचे एकूण एकावन्न प्रकार लिहलेले
दिसतात परंतु मौखिक परंपरेमुळे फक्त सतरा प्रकार
प्रत्यक्ष हाती लागतात.
मराठी भाषेतलं पहिलं भक्तिगीत राजा सोमेश्वराच्या
मानसोल्लासातलं आहे. ही गोष्ट ११३० सालची.

धर्म आणि संगीत यांचा भारतात अतिशय
जवळचा संबंध आहे. भक्ती पंथाच्या आगमनानंतर
तो अधिकच गाढा व रंगदार बनला
महाराष्ट्रातल्या धर्म संगीत प्रवाहाने वळणे घेत घेत
गेल्या आठ-अकरा वर्षात अनेक मनोहारी रूपे आकाराला
आणली. संगीत शब्दकारी, भावनांचा गोडवा आणि
मार्मिक तत्वज्ञान यांचा संगम म्हणता येईल
अशी ही रूपे!
यांची विविधता आणि संपन्नता ध्यानी यावी म्हणून
अनेक नामवंत कलाकारांच्या सहाय्याने
सिध्द केलेला कार्यक्रम

देवगाणी

देणगी प्रवेशिका रु. २०/-
कृपया कार्यक्रमास येताना
ही पत्रिका सोबत आणावी
आयुक्रमाणुसार आसन व्यवस्था

देवगाणी

संकल्पना-संशोधन-डॉ. अशोक रानडे
निर्मिती सुत्रधार-श्री. पु.ल. देशपांडे

सहभागी कलावंत

श्रीयुत शरद जांभेकर
श्रीयुत केदार बोडस
श्रीमती मंजुषा कुलकर्णी
श्रीमती वर्षा भावे
श्रीमती पद्मजा फेणाणी जोगळेकर
श्रीमती मेधा गोगटे-दामले
श्रीमती किर्ती शिलेदार
श्रीमती फैय्याज शेख
श्रीयुत मारूती बुवा बागडे
श्रीयुत शेखर खांबेटे
श्रीयुत चंद्रचुड वासुदेव
श्रीयुत अनंत कुंटे
श्रीयुत प्रकाश वागल
श्रीयुत राजकुमार शिरोडकर
आणि
डॉ. अशोक रानडे

विशेष सहाय्य - थिएटर अॅकॅडमी, पुणे.

मराठी नाट्यरसिकांचं शहाणं नाट्यवेड

आपल्या मुंबईत नरिमन पॉईंटच्या टोकाला प्रायोगिक कलांसाठीचं एक राष्ट्रीय केंद्र आहे. मराठीत त्याला 'एन. सी. पी. ए.' (नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस्) म्हणतात.

तिकडे कधी गेला आहात का तुम्ही? मुंबईतू सगळीकडे स्वैरसंचार करणारी मंडळीसुद्धा तिथे पोहोचतातच असं नाही. मग अंतराचा, वेळेचा, वाहनाचा, खिशाचा हिमटू हिशेब करणारे बहुसंख्य मुंबईकर त्या केंद्राच्या वाऱ्याला उभे कसे राहतील सांगा.

परंतु त्या केंद्राच्या वाऱ्याला मुद्दाम उभं राहावं असं केंद्र आहे ते. केंद्र उभारलं आहे टाटांनी. (हो. हो. तेच टाटा. कुठले? आयोडिनयुक्त मीठवाले नाही हो. विमानवाले टाटा) परंतु त्या कलाकेंद्राचं पुजारीपण पु. ल. देशपांडे, अशोक रानडे यांच्यासारख्या अस्सल मराठी माणसांनी सांभाळलं आहे.

ते ठाऊक असल्यामुळेच केंद्रात प्रवेश करताना पाऊल दचकत नाही. मात्र तिथली भव्यता, स्वच्छता, टापटीप, अभिरुचीपूर्ण सजावट आपल्यात सामावून घेताना पावलं आपोआप अदबशीर पडतात.

कार्यक्रमाचं तिकीट अर्थातच काढलेलं असतं माझ्यासारख्याने. चांगलं मंहागडं असतं ते. परंतु त्या महागड्या तिकिटात मावणारं नाही असं तिथलं खानदानी वातावरण चवीचवीने भोगता येतं ना.

म्हणजे कार्यक्रम तसा फुकटातच पडतो!

या वर्षाच्या पहिल्याच दिवशी असा फुकटातला कार्यक्रम पाहायचा योग आला : देव-गाणी.'

पारंपरिक मराठी भक्तिगीतांचे कितीतरी प्रकार ऐकायला-पाहायला मिळाले. जोडीला पु. ल. देशपांडे, अशोक रानडे या जोडगोळीचं नीटनेटकं निरुपण. (निवेदनच खुर्च्यांत बसून, वाचत-हसत केलं म्हणजे 'निरुपण' होतं त्याचं. सत्कारात गेल्यावर नारळाचं जसं 'श्रीफळ' होतं, तसंच आहे हे.)

अस्सल मराठी माणसं म्हटलं मी या दोघांना, परंतु ते उगाच जादा सलगीने आणि नेहमीच्या सवयीने, तर म्हटलं नाही ना, असं आता वाटतंय. कारण यांनी मांडलेल्या कोणत्याही कार्यक्रमात खास मराठमोळ्या अघळपघळपणाला जागाच ठेवलेली नसते. त्याशिवायच कलात्मकता आणू पाहतात ते. मायबाप रसिकांबद्दल तुच्छता तर एवढी की कार्यक्रम जाहीर केलेल्या वेळेवरच सुरू होतो.

शहराच्या टोकाला असलेल्या या केंद्रात मी अधूनमधून जातो याचं कारण मी तिथे फार्फार दिवसांत गेलो नाही तर माझ्या डोळ्यांना रांजणवाड्या होतात.

गमतीची गोष्ट अशी की फार्फार दिवसांत मी दादरला छबिलदासमध्ये नाटक पाहिलं नाही म्हणजेसुद्धा माझ्या डोळ्यांना रांजणवाड्या होतात!

खरं तर कुठे एन्. सी. पी. ए. आणि कुठे छबिलदास लल्लुभाई बॉईज हायस्कूलचं नाट्यगृह.

परंतु माझ्यासारख्या भाविक नाटक्याला दोन्ही मंदिरंच की.

छबिलदासच्या सगळ्या वाटांवर गजबजाट-किलकिलाट-रबरबाट. नाट्यगृहाकडे नेणाऱ्या दोन जिन्यांच्या पायऱ्यांवर पावलं अदबीनं टाकायची सोयच नाही. खुद्द नाट्यगृहात भारतीय बैठक किंवा भारतीय खुर्च्या.

त्यामुळे तिकीट काढलेलं असलं तरी आपण फुकटातच नाटक बघतोय की काय, असंच वाटत राहतं माझ्यासारख्याला.

अलिकडे फुकटातच असं एक नाटक पाहिलं : 'सावल्या'

चेतन दातार नावाच्या तरुण मुलाने लिहिलेल्या या नाटकाचं दिग्दर्शन केलं होतं जुन्या-जाणत्या सत्यदेव दुबेने. (सत्यदेव दुबेजींना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाला होता ही माहिती महाराष्ट्र शासनाला मिळाली नाही. म्हणून त्यांना एक लाखाचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार मिळालाच नाही, असं ऐकतो.)

'सावल्या' या नाटकात आहेत सगळ्याच मुली आणि बायका. पुरुषांनी त्यांच्या आयुष्यांचा केलेला विस्कोटं, या नाटकात मांडला आहे.

नाटकात भडकपणा आहे. नाटकी युक्त्या वापरल्या आहेत थोड्या.

परंतु त्या साऱ्याजणींनी मिळून केलेल्या सहजसुंदर अभिनयाने एक दुर्मिळ नाट्यानुभव मला लाभला. छबिलदासी नाट्यगृहाच्या खास मांडणीमुळे हा नाट्यानुभव अधिकच उत्कट झाला.

मुंबईकर मराठी नाट्यरसिकांचं नाट्यवेड असं शहाणं आहे की एन्. सी. पी. ए. शहराच्या अगदी भलत्याच टोकाला असल्यामुळे तिकडे ते जात नाहीत.

छबिलदासी नाट्यगृह शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी भरवस्तीत असल्यामुळे इकडेसुद्धा ते येत नाहीत.

– अनंत भावे